# सायबर सुरक्षा काळाची गरज...

देशोन्नती 10-12-2022

देशोन्नती वृत्तसंकलन...



## सायबर सुरक्षा विषयावर विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा

**अकोला** ■ स्मार्टफोन ही आजच्या काळाची मूलभूत गरज झालेली असून, याचा उपयोग प्रत्येक व्यक्ती हा करतच आहे. परंतु, या तंत्रविज्ञानाच्या युगात इंटरनेटच्या चुकीच्या वापरामुळे सायबर गुन्ह्यांमध्ये खूप वाढ झालेली दिसून येते. विद्यार्थ्यांमध्ये, सायबर गुन्हे आणि त्याबाबतची सुरक्षा याविषयी जागृती करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सायबर आणि क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या सहयोगाने, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक सैलानी नगर, अकोला येथील सैर सैयद हायस्कूल व ज्यु. कॉलेजमध्ये सायबर सुरक्षा विषयावर विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा आयोजित केली होती.

महाविद्यालयाचे सायबर वॉरियर्स अक्षय राठोड आणि तुषार राजपूत यांनी कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेविषयी उत्कृष्ट मार्गदर्शन केले. सायबर क्राइम कोणकोणत्या प्रकारे घडतात, वाढत्या सोशल मीडियाच्या वापरातून ऑनलाइन फसवणूक कशी होते, फ्री ॲप्सद्वारे डेटा कशाप्रकारे चोरी होतो याबाबत सविस्तर माहिती सांगितली. विविध ऑनलाइन फसवणुकीपासून स्वतःला कसे सुरक्षित ठेवावे, कोणती दक्षता घ्यावी, मोबाइलमध्ये २ स्टेप व्हेरिफिकेशन कसे करावे, एचटीटीपीएस वेबसाइट्सला व्हिजिट करावे, ॲंटिव्हायरस सॉफ्टवेअर इंस्टॉल करावे याबाबत माहिती सांगितली. यावेळी सायबर सुरक्षा टिप्स असलेले माहितीपत्रक उपस्थितांना वाटप करण्यात आले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक सुमय्या अरबी यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा हा विषय अति महत्त्वाचा असून, प्रत्येकाने मोबाइलचा वापर कमीत कमी आणि अति आवश्यकता असल्यासच करावा, असे आवाहन करून मार्गदर्शन केले आणि महाविद्यालयाच्या या समाजजागृतीच्या कार्यास शुभेच्छा दिल्या.

कार्यशाळेमध्ये अब्दुल वहीद, शेख अख्तर, अबरार, अब्दुल शकीफ, अनसार अहमद व इतर सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.